# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:02.01.2026** **वार:शुक्रवार**

1. 'विकसित भारत जी-राम जी' योजनेत शेती आणि रोजगार हमी यांचा योग्य समतोल साधला असल्याचं-केंद्रीय ग्रामीण विकास मंत्री शिवराज सिंह चौहान यांचं प्रतिपादन
2. राज्यात नैसर्गिक शेती क्रांती आणण्यासाठी कृषि विद्यापीठांनी योगदान द्यावं-राज्यपालांचं आवाहन
3. राज्यातल्या 29 महानगरपालिकांच्या निवडणुकीसाठी अर्ज मागे घेण्याचा आज अंतिम दिवस आणि
4. 99व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचं आज साताऱ्यात औपचारिक उद्घाटन

**शिवराजसिंग चौहान-अहिलयानगर**

'विकसित भारत जी-राम जी' योजनेत शेती आणि रोजगार हमी यांचा योग्य समतोल साधला असल्याचं प्रतिपादन, केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी केलं आहे. अहिल्या नगर जिल्ह्यात राहाता तालुक्यातल्या लोणी बुद्रुक इथं 'विकसित भारत जी-राम जी' अभियानांतर्गत आयोजित विशेष ग्रामसभेत ते काल बोलत होते. गावाच्या विकासाचे निर्णय आता दिल्ली किंवा मुंबईतून घेण्याऐवजी थेट ग्रामसभेच्या माध्यमातून गावकऱ्यांनीच घ्यायचे आहेत, असं चौहान यांनी सांगितलं. जुन्या रोजगार हमी योजनेतील त्रुटी दूर करून, नव्या 'विकसित भारत जी-राम जी' योजनेअंतर्गत आता प्रत्येक ग्रामीण कुटुंबाला 100 दिवसांऐवजी 125 दिवसांच्या रोजगाराची हमी देण्यात आलं आहे; काम केल्यानंतर 15 दिवसांच्या आत मजुरीची रक्कम थेट बँक खात्यात जमा होईल. यामध्ये प्रशासकीय कारणास्तव विलंब झाल्यास मजुराला 5 शतांश टक्के दरानं व्याजासह रक्कम देण्याची कायदेशीर तरतूद या योजनेत करण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली. या कार्यक्रमाला जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

**राज्यपाल**

राज्यात नैसर्गिक शेतीमध्ये क्रांती आणण्यासाठी कृषि विद्यापीठांनी योगदान द्यावं, असं आवाहन राज्यपाल आणि कुलपती आचार्य देवव्रत यांनी काल केलं. कृषि विभागाचे वरिष्ठ अधिकारी तसंच राज्यातील कृषि आणि पशु विज्ञान विद्यापीठांच्या कुलगुरूंशी त्यांनी दूरस्थ माध्यमातून संवाद साधला. जागतिक हवामानाचं गंभीर संकट लक्षात घेऊन राज्यातील कृषि विद्यापीठांनी पारंपरिक देशी बियाणांना संस्कारित करून त्यांचं जतन संवर्धन करावं आणि प्रतिकूल परिस्थितीमध्ये देखील शेतकऱ्यांना उत्पन्न मिळेल अशा प्रकारचं बियाणं निर्माण करावं असं ते म्हणाले.

**राज्यपाल-नाशिक**

राज्यपालांनी काल रात्री नाशिक जिल्ह्यातील दिंडोरी तालुक्यातील पिंपरखेड इथल्या ग्रामस्थांशी संवाद साधत त्यांना वृक्षारोपण, स्वच्छता, नैसर्गिक शेती, गोपालनाचं महत्त्व सांगितलं. 'एक पेड माँ के नाम' उपक्रमांतर्गत त्यांनी पिंपरखेड इथल्या महाविद्यालयात वृक्षारोपण केलं. त्र्यंबकेश्वर इथल्या हिवाळी पाड्यावरील जिल्हा परीषदेच्या शाळेचं राज्यपालांनी कौतुक केले. या शाळेतील विद्यार्थी दोन्ही हातांनी लिहू शकतात. याबरोबरच भारतीय राज्य घटनेतील कलमे तसंच एक हजार संख्येपर्यंतचे पाढे म्हणतात.

**निवडणूक**

राज्यातल्या महानगरपालिकांच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत आज दुपारी 3 वाजता संपणार आहे. उद्या निवडणूक चिन्हाचं वाटप झाल्यानंतर अंतिम उमेदवार यादी जाहीर होईल. येत्या 15 जानेवारीला मतदान तर 16 जानेवारीला मतमोजणी होणार आहे.

**<u>निवडणूक-बिनविरोध</u>**

काही ठिकाणचे अर्ज बाद झाल्यानं काही उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. मालेगाव महानगरपालिकेत प्रभाग 6 मधे प्रतिस्पर्धी पक्षांचे उमेदवारी अर्ज बाद झाल्याने इस्लाम पार्टीच्या उमेदवार मुनीरा शेख या बिनविरोध निवडून आल्या. कल्याण डोंबिवली महानगरपालिकेत शिवसेनेचे तीन आणि भाजपाचा एक उमेदवार बिनविरोध निवडून येणार हे स्पष्ट झालं आहे. त्यामुळे कल्याण डोंबिवली महानगरपालिकेत बिनविरोध निवडून येणाऱ्या उमेदवरांची संख्या आता आठ झाली आहे.

जळगाव महानगरपालिकेतल्या प्रतिस्पर्धी उमेदवारांचे अर्ज बाद ठरल्याने प्रभाग क्रमांक 12 ब मधल्याभाजपा उमेदवार उज्ज्वला बेंडाळे यांचा बिनविरोध निवडीचा मार्ग मोकळा झाला आहे.

धुळे महानगरपालिकेत प्रभाग क्रमांक 17 ब मधे दोन अपक्ष उमेदवारांनी अर्ज मागे घेतल्याने भाजपाच्या उमेदवार सुरेखा उगले यांचा बिनविरोध निवडीचा मार्ग मोकळा झाला. याआधीच दोन उमेदवार बिनविरोध निवडले गेल्यामुळे धुळ्यातून भाजपाच्या तीन उमेदवारांची बिनविरोध निवड निश्चित झाली आहे.

**<u>साहित्य संमेलन-सातारा</u>**

99 व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचं औपचारिक उद्घाटन आज सकाळी 11 वाजता ज्येष्ठ लेखिका, विचारवंत मृदुला गर्ग यांच्या हस्ते होणार आहे. या संमेलनाचे नियोजित अध्यक्ष विश्वास पाटील, 98व्या साहित्य संमेलनाच्या अध्यक्ष डॉक्टर तारा भवाळकर, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मराठी भाषा मंत्री उदय सामंत, स्वागताध्यक्ष शिवेंद्रसिंहराजे भोसले, खासदार उदयनराजे भोसले यांच्यासह इतर मान्यवर उद्घाटन सोहळ्याला उपस्थित राहणार आहेत.

तत्पूर्वी ध्वजारोहण आणि ग्रंथदिंडीनं काल साहित्य संमेलनाला सुरुवात झाली. साहित्य महामंडळाचे अध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी यांच्या हस्ते ध्वजारोहण झालं. त्यानंतर झालेल्या ग्रंथदिंडीला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळालं. विविध संकल्पनांनी सजलेले आकर्षक रथ... संतांच्या आणि थोर व्यक्तिमत्वाच्या वेशभूषेतील बालगोपाळ, ढोल ताशांचा गजर आणि रांगोळ्यांच्या सुंदर पायघड्या... अशा जल्लोषपूर्ण आणि उत्साही वातावरणामध्ये ग्रंथदिंडी काढण्यात आली. मावळत्या संमेलनाध्यक्ष डॉक्टर तारा भवाळकर यांच्या हस्ते ग्रंथप्रदर्शनाचं उद्घाटन झालं. यावेळी बोलताना त्या म्हणाल्या.....

**शंभराकडे चाललेलं हे साहित्य संमेलन इथं साजरं होतंय आणि विशेषतः महाराष्ट्रामध्ये शिवरायांच्या भूमिका याचा आनंद आहे. मराठी भाषा टिकायची असेल तर पहिल्यांदा मराठी शिक्षण टिकलं पाहिजे, प्राथमिक शाळेपासून त्याच्याकडे नीट लक्ष दिलं पाहिजे, आणि त्याच्यासाठी शासकीय जबाबदारी पालकांची जबाबदारी समाजाची जबाबदारी खूप मोठी आहे. तेव्हा मराठीला अभिजात दर्जा मिळाला ही आनंदाची गोष्ट आहे. परंतु अभिजात साहित्य वाचणारी मंडळी पुढच्या पिढीमध्ये सतत टिकून राहिली पाहिजेत याच्यासाठी प्रयत्न होणं सर्व आघाड्यांच्यावर हे अतिशय महत्त्वाचं आहे.**

पुढचे दोन दिवस चालणाऱ्या या संमेलनात विविध साहित्यविषयक कार्यक्रम, परिसंवाद, आणि सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहेत.

**<u>सुधारणांचं वर्ष</u>**

नव्या वर्षाचं स्वागत करत असताना सरत्या वर्षातील घडामोडींचा आढावा सुधारणांचं वर्ष या विशेष मालिकेत आपण घेत आहोत. 2025 या वर्षात भारताच्या वैज्ञानिक आणि तंत्रज्ञानातील वाटचालीनं एक निर्णायक टप्पा गाठला. या क्षेत्रात जागतिक स्तरावर देशाची ओळख नव्यानं निर्माण झाली. भारताच्या विज्ञान आणि तंत्रज्ञानातील कामगिरीविषयी ऐकूया माझे सहकारी पराग चिंचोळकर यांच्याकडून...

**2025 या वर्षात कृत्रिम बुद्धिमत्ता आणि सेमी कंडक्टर्स पासून ते अंतरिक्ष संशोधन, अणुऊर्जा आणि महत्वाच्या खनिजांपर्यंत आपण जागतिक तंत्रज्ञान केवळ वापरलं नाही तर निर्माणही केलं. कृत्रिम बुद्धिमत्ता मिशन अंतर्गत, केंद्र**

**सरकारनं मानव-केंद्रित कृत्रिम बुद्धिमत्तेमध्ये भारताला पुढे आणण्यासाठी, सेमीकंडक्टर उत्पादनाला केंद्रस्थानी ठेवत, 10 हजार कोटींपेक्षा जास्त गुंतवणूक करण्याचं उद्दिष्ट ठेवलं आहे. नोएडा आणि बेंगळुरू इथं गेल्या वर्षी मे महिन्यात, सरकारनं 3 नॅनोमीटर चिपच्या डिझाइनसाठी 2 आस्थापना सुरू केल्या. सेमीकंडक्टर यंत्रणा उभारण्यासाठी महत्वपूर्ण खनिजांची गरज असते. त्यासाठी सरकारनं मागील वर्षी जानेवारी मध्ये 16 हजार 300 कोटी रुपये खर्च करून राष्ट्रीय क्रिटिकल मिनरल मिशन सुरू केलं. गेल्या वर्षी इस्रोनं जागतिक स्तरावर तसंच देशांतर्गत महत्वपूर्ण योजना राबवल्या. 30 जुलैला भारत आणि अमेरिका यांच्या सहभागानं जगातील सर्वात प्रगत पृथ्वी-निरीक्षण रडार उपग्रहाचं यशस्वी प्रक्षेपण करण्यात आलं. ग्रुप कॅप्टन शुभांशू शुक्ला यांच्या आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकातील प्रवासामुळं, भारताच्या मानवी अंतराळ उड्डाणाच्या महत्त्वाकांक्षेनं एक ऐतिहासिक टप्पा गाठला. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वात भारताला केवळ सहभागी राष्ट्र म्हणून नव्हे तर जागतिक विज्ञान आणि तंत्रज्ञान क्रांतीमध्ये आघाडीचा देश म्हणून स्थान मिळालं.**

**शौर्य दिन-अभिवादन**

पुण्याजवळ कोरेगाव भीमा इथं शौर्य दिनानिमित्त लाखो अनुयायांनी विजयस्तंभाला अभिवादन केलं. उपमुख्यमंत्री आणि पुणे जिल्ह्याचे पालक मंत्री अजित पवार तसंच वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनीही कोरेगाव भीमा इथं जाऊन विजयस्तंभाला अभिवादन केलं. अभिवादन सोहळ्याच्या आयोजनासाठी मुख्यमंत्र्यांनी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याच्या सूचना दिल्याचं उपमुख्यमंत्री पवार यांनी यावेळी बोलताना सांगितलं. जिल्हा प्रशासनानं केलेल्या उत्तम नियोजनाबद्दल उपमुख्यमंत्री पवार तसंच प्रकाश आंबेडकर यांनी समाधान व्यक्त केलं.

**बीड-अजित पवार**

बीडमध्ये सहकार भवन इमारतीचा भूमीपूजन सोहळा उपमुख्यमंत्री आणि बीडचे पालक मंत्री अजित पवार यांच्या हस्ते काल पार पडला. इमारतीसाठी सुमारे 15 कोटी रुपये निधीची मान्यता देण्यात आली आहे. बीड जिल्ह्यातल्या 575 कोटी रुपये खर्चाच्या विकासकामांचा प्रारंभही काल करण्यात आला.

**नक्षलपीडित नियुक्ती-गडचिरोली**

गडचिरोली जिल्हा प्रशासनाने जिल्हाधिकारी अविशांत पंडा यांच्या पुढाकारातून नक्षलपीडित कुटुंबातील 29 तरुणांना शासनसेवेत सामावून घेत त्यांची जिल्हाधिकारी कार्यालयाअंतर्गत शिपाई पदावर नियुक्ती केली आहे. काल या नियुक्तीपत्रांचं वितरण करण्यात आलं.

**हवामान**

राज्याच्या बहुतांश भागात थंडीचा जोर कायम आहे. काल गोंदियामध्ये राज्यातल्या सर्वात कमी, म्हणजे 8 पूर्णांक 5 अंश सेल्सियस इतक्या किमान तापमानाची नोंद झाली. येत्या 24 तासात राज्यात सर्वत्र कोरडं हवामान राहण्याचा हवामान विभागाचा अंदाज आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.